**प्रकल्प प्रवर्तक मेसर्स राष्ट्रीय केमिकल्स एण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ), थळ, तालुका-अलिबाग, जिल्हा - रायगड, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित १,२०० एमटीपीडी (डीएपी आधार) एनपीके / डीएपी कॉम्प्लेस फर्टिलायझर विस्तारीत प्रकल्प उभारणी कार्यरत प्रकल्पात करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी बाबतचा इतिवृत्तांत -**

---

प्रकल्प प्रवर्तक मेसर्स राष्ट्रीय केमिकल्स एण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ), थळ, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित १,२०० एमटीपीडी (डीएपी आधार) एनपीके/डीएपी कॉम्प्लेस फर्टिलायझर विस्तारीत प्रकल्प उभारणी कार्यरत प्रकल्पात करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी , २०२३ रोजी दुपारी ०१.०० वाजता साई-इन हॉटेल, रेवस रोड, चौंढी-किहिम, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड - ४०२२०१ येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री. रा. सं. कामत, उप प्रादेशिक अधिकारी, रायगड - २, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी डॉ. पद्मश्री बैनाडे, अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड तथा अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती, श्री. विद्यासागर किल्लेदार, प्रभारी प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड तथा सदस्य, आयोजक, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, स्थानिक शेतकरी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मेसर्स राष्ट्रीय केमिकल्स एण्ड फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ), थळ, तालुका-अलिबाग, जिल्हा - रायगड, महाराष्ट्र, यांचा प्रस्तावित १,२०० एमटीपीडी (डीएपी आधार) एनपीके / डीएपी कॉम्प्लेस फर्टिलायझर विस्तारीत प्रकल्प उभारणी कार्यरत प्रकल्पात करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग ५(अ) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल विभागाची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल विभागातील तज्ज्ञ समितीस प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दि. २४-१२-२०२१ रोजी सादर केला व त्यास भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दि. २०-०१-२०२२ रोजी प्रदान केली. जिल्हाधिकारी, रायगड, अलिबाग यांनी पर्यावरणविषयक जाहीर

जनसुनावणी आयोजित करण्यास दिनांक १५-११-२०२२ रोजी परवानगी दिलेली होती, मात्र कायदा व सुव्यवस्थेच्या मुद्दयावर सदरची जनसुनावणी ही पुढे ढकलण्यात आलेली होती.

जिल्हाधिकारी, रायगड, अलिबाग यांनी पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी घेण्यास मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्र. ई-१३, व्दारा पत्र क्रं.बीओ / जेडी / डब्लुपीसी / पीएच / बी-२३०२०९-एफटीएस-०१४५ दिनांक ०९-०२-२०२३ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, रायगड,अलिबाग<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी प्रादेशिक अधिकारी- रायगड<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>रायगड भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी, रायगड-२<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>रायगड भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई | - | **आयोजक** |

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक कार्यालय, रायगड-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर दैनिक वृत्तपत्र

कृषिवल, रायगड व सकाळ या स्थानिक वृत्तपत्रामध्ये मराठीत व इंडियन एक्सप्रेस या वृत्तपत्रात इंग्रजीत जनसुनावणीबाबत जाहीर सूचना व ऑनलाईन लिंकबाबत दि. २६-०१-२०२३ आणि २८-०१-२०२३ रोजी जाहीर सूचना प्रकाशित करण्यात आलेली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते -

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य विभाग, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिएल बिल्डिंग, तळमळला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन नागपूर.

२) जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड, अलिबाग, जिल्हा- रायगड.

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड, अलिबाग.

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड, अलिबाग.

५) तहसीलदार, तहसील कार्यालय- अलिबाग, जिल्हा- रायगड.

६) पोलिस अधिक्षक, तालुका-अलिबाग, जिल्हा- रायगड.

७) मुख्य अधिकारी, अलिबाग नगर परिषद, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड.

८) ग्रामपंचायत कार्यालये - धूप, थळ, बोरीस-गुंजीस, नवगाव, किहिम, कुरुळ, विधी, पंढरे, मापगाव, मानीभूते, वरसोली, कोपर-खिडकी, परहुर पाडा, झिराड, आवास-सासवणे, अक्षी, रेवदंडा, रामराज, सातीर्जे, नागाव.

९) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय भवन, १५वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

१०) मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू प़ॉईंट, ३ रा मजला, सायन-माटुंगा स्कीम रस्ता नं.८, सायन सर्कलजवळ, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२.

११) प्रादेशिक अधिकारी-रायगड, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६ वा मजला, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.

१२) उप प्रादेशिक अधिकारी, रायगड -२, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, ६ वा मजला, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.

१३) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई.

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी म. प्र. नि. मंडळास ईमेलव्दारे ०२ व टपालाव्दारे १२ सूचना / आक्षेप प्राप्त झालेले आहेत व त्याच्या नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप, हरकती, सूचना असल्यास ती संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी सांगितले की ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून कोणताही निर्णय वा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. सदरहू सूचना / आक्षेप यांची इतिवृत्तामध्ये नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डीग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित सूचना, आक्षेप, प्राप्त झालेल्या लेखी सूचना / आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ याच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समितीच्या विवेचनानंतर त्यांनी प्रकल्प प्रवर्तक यांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी सादरीकरण करण्याची सूचना केली.

त्यावेळी उपस्थितांमध्ये आपसात चर्चा सुरु झाली. श्री. दीपक रानवडे यांनी त्यांचे काही आक्षेप नोंदविणार असल्याची मागणी केली. त्यावेळी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सादरीकरणानंतर आपणास ती संधी देण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यावेळी उपस्थितांनी एकत्रित गलका केला. उपस्थितांमध्ये महिलावर्गाचे प्रमाण हे लक्षणीय होते. अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी श्री. दीपक रानवडे यांना त्यांच्या सूचना थोडक्यात सांगण्यास अनुमती दिली.

श्री. दीपक रानवडे यांनी सांगितले की जनसुनावणीबाबतची सूचना मिळालेली आहे. पण आमचे असे म्हणणे आहे की गेले १३ वर्षे प्रकल्पग्रस्तांचा एक प्रश्न प्रलंबित आहे. काल-परवा जिल्हाधिकारी यांनी सदरहू प्रश्न त्वरित सोडण्याचे आश्वासन दिलेले असून प्रथम १३ वर्षे प्रलंबित असलेला प्रश्न सोडवावा व नंतर ही जनसुनावणी आयोजित करण्यात यावी. ह्या एनपीके - नायट्रोजन, फॉस्फरस व पोटॅशियम प्रकल्पास आमचा विरोध नाही. हे खत आपल्या जिल्ह्याला, महाराष्ट्राला व देशाला पाहिजेच. पण त्या अगोदर जे प्रकल्पग्रस्त घरी बसलेले आहेत, त्यांना एक-दोनवेळचे जेवण मिळत नाही, त्यांना न्याय मिळणे गरजेचे आहे. पर्यावरणविषयक समिती म्हणेल की आमचा त्या मुद्दयांशी संबंध नाही. आमचा प्रकल्पास विरोध नाही, मी व्यक्तीशः अशा प्रकल्पात काम केलेले आहे. तरी प्रथम प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडवा, नंतरच जनसुनावणी आयोजित करण्यात यावी. तसे न झाल्यास ह्या जनसुनावणी आयोजनास आमचा पूर्ण विरोध आहे.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की कालच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नासांठी जिल्हाधिकारी कार्यालयात प्रकल्प व्यवस्थापनांशी चर्चा केलेली आहे. प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याबाबतची प्रक्रिया सुरु झालेली आहे. प्रकल्प प्रवर्तक-आरसीएफ यांना त्याबाबत खुलासा मागविण्यात आलेला आहे. प्रकल्पग्रस्तांची मागणी कुठेच डावलण्यात आलेली नाही. तरी सर्वांना विनंती आहे की प्रथम सादरीकरण पुर्ण करण्यात यावे. नंतर आपल्या नावानिशी आपली सूचना, विचार, आक्षेप यांची बैठकीच्या इतिवृतांत

नोंद घेण्यात येईल. मात्र सर्व उपस्थितांनी त्यास विरोध केला. अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की एनपीके हे शेतीसाठी आवश्यक असून बरेच शेतकरी हे खाजगी कंपन्यांकडून महाग असतानाही विकत घेतात. मात्र सर्व उपस्थित आक्रमक झालेले होते. महिला वर्गही जनसुनावणी बंद करण्याच्या घोषणा देत होते. त्यावेळी अध्यक्षा यांनी प्रतिपादन केले की हा प्रकल्प झालाच पाहिजे व प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळालाच पाहिजे. जिल्हाधिकारी कार्यालयातून ती प्रक्रिया सुरुवात झालेलीच आहे. पण आजच्या आजच ती प्रक्रिया होऊ शकत नाही.

त्यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्या रायगड सौ. मानसी महेंद्र दळवी यांनी मागणी केली की आमची जमीन गेली, जागा गेली, त्या बदल्यात आम्हांला जी काही सर्टिफिकेट दिली, तर त्यांना प्रकल्पग्रस्त म्हणून प्रकल्पात नोकरीसाठी समाविष्ट करणार म्हणून लेखी आश्वासन द्या.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सदरहू बाब ही विचाराधीन आहे, या जनसुनावणीच्या पार्श्वभूमीवरच काल दोन वेळा माननीय जिल्हाधिकारी यांनी बैठक घेतलेली होती. जे कायद्याने व नियमाने बंधनकारक आहे, ते कंपनीस करावेच लागेल. त्यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्या रायगड सौ. मानसी महेन्द्र दळवी यांनी १३ वर्षांपासुन ही मागणी पाईपलाईनमध्ये आहे. तर आता ते काय करणार. गेले १३ वर्षे आम्ही संघर्ष करत आहोत. ती सर्टिफिकेट आम्ही पुढच्या पिढीच्या नावावर केली. पण आरसीएफमध्ये नोकरी मिळत नाही. आमचे जे हक्काचे आहे, ते आम्हांला मिळालेच पाहिजे.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की हायकोर्टाच्या निर्देशांनुसार जिल्हाधिकारी यांनी कंपनीस पत्र दिलेले आहे. त्यात हायकोर्टाच्या निर्देशांनुसार प्रकल्पग्रस्तांना नोक-या दिल्या की नाही याची माहिती मागितलेली आहे. आरसीएफ त्यांचा अहवाल सादर करणार आहे. जे प्रकल्पग्रस्त आहेत, त्यांना नोक-या देण्यास शासन, जिल्हाधिकारी कार्यालय कटीबध्द आहे. आरसीएफला ते कायद्याने करणे बंधनकारक आहे.

त्यावेळी माजी जिल्हा परिषद रायगड सदस्या सौ. मानसी महेंन्द्र दळवी यांनी सांगितले कोर्टाने मंजूरी दिलेली असून मंत्रीमहोदय यांनीही त्यावर स्वाक्षरी केलेली आहे. तरीही गेले १३ वर्षे काहीही झालेले नाही. तर अगोदर आरसीएफने प्रकल्पग्रस्तांना नोकरीबाबत खुलासा द्यावा नंतरच ही जनसुनावणी आयोजित करण्यात यावी. अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आरसीएफने खुलासा करणे बंधनकारक आहे. आपण प्रकल्पग्रस्त आहात, त्याचप्रमाणे नवीन लोकांनाही नोक-या पाहिजेत. प्रकल्पग्रस्तांची मागणी ही अमान्य करतच नाही. पण नवीन लोकांनाही नोक-या हव्यात. त्यावेळी काही उपस्थितांनी सांगितले की आम्ही स्थानिक असून आमचे सर्व घरदार गेले. गेले ३० वर्षे आम्ही नोकरीसाठी भांडत असूनही काहीही झालेले नाही. तर आम्हाला नोकरी न देता दुसरी भरती कशासाठी करता ? बाहेरची माणसे येथे येऊन राहली. पण प्रकल्पग्रस्तांना काहीही मिळाले नाही. त्यावेळी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळणार, त्याचप्रमाणे नवीन प्रकल्पात रायगड जिल्ह्यातील तरुण तरुणींना रोजगाराची संधी मिळणार.

माजी जिल्हा परिषद सदस्या रायगड सौ. मानसी महेंन्द्र दळवी यांनी सांगितले की गेले १३ वर्षापेक्षा जास्त आम्ही लढा देत आहोत. उपोषण कितीतरी वेळा केलेली आहेत. आज तुम्ही जनसुनावणी करुन जाल, पण प्रकल्पग्रस्तांचे काय, जोपर्यंत प्रकल्पग्रस्तांचा निर्णय होत नाही, तोपर्यंत आम्ही जनसुनावणी चालू करुनच देणार नाही.

त्यावेळी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीचे इतिवृत्त हा असा दस्तावेज आहे की तो केंद्र शासनाकडे जातो, त्यात आपली नावें व मागण्या यांचा समावेश असतो. तरी उपस्थितांनी सहकार्य करावे.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे प्रकल्प प्रवर्तक यांनी सादरीकरण करताना सांगितले की भारत हा कृषिप्रधान देश असून २०१८-१९ मध्ये डीएपीची मागणी सुमारे

१०५ लाख टन होती, त्यापैकी ६६ लाख टन डीएपी आयात करावे लागलेले आहे. महाराष्ट्रात डीएपीची मागणी सुमारे ८.९ लाख टन होती, त्यापैकी ५.१ लाख टन डीएपीची आयात केलेली आहे. आत्मनिर्भर भारत च्या राष्ट्रीय दृष्टीकोनातून अणि डीएपी / एनपीकेची वाढती देशातील मागणी पूर्ण करण्यासाठी आरसीएफने नवीन १२०० एमटीपीडी डीएपी / एनपीके सयंत्र स्थापित करण्याची प्रस्ताव ठेवलेला आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सादरीकरण करताना सांगितले की सदरहू प्रकल्प स्थापनेमुळे पर्यावरणास कुठलाही धोका नाही, जल, वायू, माती यांच्यावर कुठलाही प्रतिकूल परिणाम होणार नाही. प्रदूषकांची पातळी ही उपलब्ध सर्वोत्तम तंत्रज्ञानाव्दारे नियमांनुसार मर्यादेतच राहणार आहे. प्रदुषण नियंत्रण यंत्रणासाठी अंदाजे खर्च २५ कोटी येणार असून वार्षिक देखभाल खर्च सुमारे दोन कोटी असेल. येथील स्थानिकांची सामाजिक व आर्थिक उन्नती होईल.

सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी मांडण्याचे आवाहन करण्यात आले. पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की प्रकल्पाबाबत आपल्या पर्यावरणविषयक विचार, सूचना वा आक्षेप आहेत, त्या थोडक्यात मांडाव्यात. सूचना किंवा आक्षेप नोंदविताना आपले नाव व गावाचे नाव सांगावे.

सादरीकरणानंतर अध्यक्षा यांनी उपस्थितांनी शांतपणे सादरीकरण ऐकल्याबद्दल धन्यवाद दिले. त्यांनी सांगितले की आपण जी मागणी केली की मुंबई उच्च न्यायायलयाने रिट पिटिशन नं. ६४०८ / २००५, मध्ये १३ फेब्रुवारी, २००७ रोजी जो निवाडा दिला त्याचा पॅरा १३ वाचायचा आहे. त्यात नमुद केले की आरसीएफच्या पंचक्रोशीत जे निवासी आहेत, मागणीप्रमाणे जे हायकोर्टाचा निवाडा आहे, तो आरसीएफला बंधनकारक असून त्याप्रमाणे आरसीएफने पुढील कार्यवाही करावी. तो पॅरा १३ बैठकीत वाचून दाखववावा व तो बंधनकारक आहे हे इतिवृतात नोंद घेण्याची सूचना करण्यात आलेली आहे.

निवाडा दिलेला पॅरा १३ असा आहे की –

13) **In the light of the above, the following Order:-**

i. The Petitioners have complied with the obligations of providing employment to the 385 project affected families and or persons named by them and are not duty bound to provided any further guaranteed employment except to give preference in case more jobs are generated by expansion of the project to families of P.A.P.'s, as set out in the letter dated 25-03-2005.

ii. The Collector of the District is directed to conduct an enquiry for the purpose of issuance of certificate to other than the 385 who were eligible. If the Collector comes to the finding, that 180 families have been issued more than one certificate, then in the certificates issued to second or third person in the same family, to record that one member has already been provided employment.

तरी कोर्टाच्या आदेशानुसार प्रकल्पबाधितांच्या कुटूंबियांचाही उल्लेख करण्यात आलेला आहे.

अध्यक्षा यांनी सांगितले की मागे जी प्रक्रिया झालेली आहे, त्यात ग्रामस्थांना आक्षेप आहे, त्याबाबत जिल्हाधिकारी पुन्हा चौकशी करत आहेत. तरी PAPs ज्या कौटुंबिक सदस्य आहेत, त्यांच्यासाठी पुढील कार्यवाही ही बंधनकारक आहे.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्पग्रस्तां व्यतिरिक्त जे कोणी असतील त्यांना बोलण्याची संधी देण्यात येते. येथे मच्छिमार संघटनांना निवेदन किंवा आर.सी.एफ.च्या पर्यावरणाबाबत प्रश्न विचारायचे असतील तर ते विचारावे, त्यापूर्वी आपले नाव, गाव सांगण्यात यावे. ज्यांना लेखी निवेदन द्यायचे असतील, त्यांनी लेखी निवदेन सुध्दा द्यावे.

**खालील व्यक्तींनी चर्चेत सहभाग घेतला व त्यांना प्रकल्प सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे:-**

**१) श्री उल्हास वाटकरे, चिटणीस महाराष्ट्र मच्छिमार कृती समिती नवेदर नवगाव मच्छिमार समिती अध्यक्ष:-**

सुनावणी आयोजनासाठी धन्यवाद. आरसीएफच्या १२०० एमटीपीडी (डीएपी आधार) एनपीके/डीएपी कॉम्प्लेस फर्टिलायझर प्रकल्प स्थापित करण्यासाठी जो प्रारुप अहवाल सादरीकरणात दाखविला, तर त्यात हवामानाचा अभ्यास कालावधी २० जानेवारी २०२२ ते १९ एप्रिल २०२२ असा आहे. तर हा कालावधी चुकीचा व दिशाभूल करणारा आहे. कारण जुन ते सप्टेंबर या पावसाळी ऋतुमध्ये मातीचे, जल व हवेचे प्रदूषण हे सर्वात जास्त होते. त्या सिझनमध्ये तो अहवाल केलेला नाही.

सध्या कार्यरत प्रकल्पात होणा-या प्रदूषणामुळे आरसीएफने समुद्रात टाकलेल्या पाईपमुळे दरवर्षी आर्थिक नुकसान होते. त्याची नुकसानभरपाई गेले ३० वर्षे मच्छिमारांना मिळालेली नाही. त्यांनी दिलेल्या निवेदनामध्ये १ ते ७ संदर्भ दिलेले आहेत. (२०१८ पासून अद्याप पावेतो). आपल्याबरोबरही मच्छिमारांची एक बैठक झालेली आहे. तर त्याबाबत कुठलीही दखल घेण्यात आलेली नाही. आरसीएफकडून बाधित मच्छिमार व शेतक-यांना कुठलीही आर्थिक मदत न दिल्याने आमच्यावर अन्याय झालेला आहे. त्यामुळे स्थानिकांची प्रकल्प व्यवस्थापनावर विश्वासहर्ता राहिलेली नाही. सध्या आरसीएफ चेंबूर, मुंबई येथे हा प्रकल्प कार्यरत असून आमच्या माहितीप्रमाणे हा प्रकल्प थळ येथे हलविण्यात येत आहे. चेंबूर, मुंबई येथील रहिवाशांचे आरोग्य धोक्यात आल्याने तेथील रहिवाशांच्या तक्रारीमुळे तो येथे हलविण्यात येत आहे. त्यामुळे थळ व आजूबाजूच्या गावातील लोकांचे आरोग्य धोक्यात येणार आहे. हा प्रकल्प आरोग्यास धोकादायक आहे. कॅन्सर सारखे धोकादायक रोग सदरहू प्रकल्पामुळे होण्याची शक्यता असल्याने तो तेथून हालवून येथे आणला जात आहे. देशाच्या विकासाच्या नावाखाली परिसर भकास करण्याचा डाव आहे.

आरसीएफने तयार केलेल्या अहवालात जो स्थानिक ग्रामपंचायतेस देण्यात आला, त्यात पाणी गुणवत्तेतील आकडेवारीनुसार, पाण्यातील घटक ही मर्यादेपेक्षा जास्त आहेत. त्याचप्रमाणे मृद / माती प्रदूषण, हवेचे, पाण्याचे प्रदूषण हे मर्यादेपेक्षा जास्त आहे. प्रकल्पातील सांडपाण्याच्या प्रदूषणामुळे ५.० नॉटिकल माईल्सपर्यंत प्रदूषके जाऊन मच्छिमारी तेथील नष्ट झालेली आहे. त्यामुळे थळ, नवगाव येथील मच्छिमारांवर उपासमारीची वेळ आलेली आहे.

कंपनीने सीएसआर निधीचा वापर स्थानिक मच्छिमारांसाठी आजतागायत केलेला नसून गेले ३० वर्षे जल, वायू व मातीच्या प्रदूषण करुन सर्व नियमांचे उल्लंघन प्रकल्प प्रवर्तकांनी केलेले आहे. पंजाब राज्यात शेतीसाठी अशी खते सातत्याने वापरल्याने ती खते जमिनीत व पाण्यात मिसळून तेथे घरोघरी कॅन्सरचे रोगी सापडतात. तरी या प्रकल्पास येथील मच्छिमार व स्थानिक शेतकरी यांचा विरोध असून हा प्रकल्प थळ येथे स्थापन करण्यास मान्यता देण्यात येऊ नये. या सर्व आक्षेपांची नोंद घेण्यात यावी.

## २) श्री आल्हाद वासूदेव पाटील, उपसरपंच, ग्रुप ग्रामपंचायत, खिडकी, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगडः-

त्यांनी सांगितले की चिटणीस, महाराष्ट्र मच्छिमार कृती समिती यांनी उपस्थित केलेल्या सर्व आक्षेपांना मी पाठिंबा देत आहे. त्यांनी सादर करण्यात येणारे लेखी निवेदनातील आक्षेप व सूचना वाचून दाखविले. त्यांनी सांगितले की प्राप्त झालेल्या कार्यकारी सारांश अहवालात आत्मनिर्भर भारतासाठी ह्या १२०० एमटीपीडी डीएपी / एनपीके खत प्रकल्पाची आवश्यकता असल्याने आरसीएफमधील रिकाम्या जागेचा उपयोग होणार आहे. तसेच प्रकल्पाबरोबरच येथील स्थानिक व्यवसायाचे संरक्षण, हक्क, जोपासना व प्रगती होणे गरजेचे आहे. येथे कच्चा माल हा जेएनपीटीमधून रोज ५०० टन सल्फ्युरिक ॲसिड जेएनपीटी बंदरातून टँकरव्दारे थळ प्रकल्पात येणार आहे. तसेच ९५० टन फॉस्फ्युरिक ॲसिडही जेएनपीटी बंदरातून टँकरव्दारे थळ

प्रकल्पात येणार आहे. महाराष्ट्र आपत्कालिन व्यवस्थापन योजनेनुसार हा संपूर्ण परिसर - जेएनपीटी ते थळ हा पूरग्रस्त विभाग आहे. तरी या रस्त्यावरुन नियमितपणे रासायनिक वाहतुक होण्याबाबत अभ्यास होणे आवश्यक आहे. विशेषतः पावसाळ्यात टँकर पलटी होण्याचे प्रमाण जास्त असल्याने सर्व बाबींचा विचार करुन जास्त अभ्यास होणे आवश्यक आहे. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाचा अभ्यास कालावधी २० जानेवारी २०२२ ते १९ एप्रिल २०२२ असा आहे. तर संपूर्ण वर्षाचा Comprehensive पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल करण्याची गरज आहे. परिसरातील सुरक्षिततेसहीत असा अभ्यास आवश्यक आहे.

त्यांनी पुढे सांगितले की अहवालात २९ कि.मी. लांबीचा रेल्वे लाईनचा उल्लेख आहे व आरसीएफ थळच्या उत्पादनाकरिता वाहतुकीसाठी त्याची उपयुक्तता दर्शविली आहे. ज्यांच्या जमिनी घेतल्या, त्यांना प्रकल्पग्रस्त म्हणून समजण्यास आरसीएफ नकार देत आहे, तर आरसीएफ रेल्वेकडे बोट दाखवत आहे. अध्यक्षा यांनी याबाबत स्पष्टीकरण देण्याची सूचना केली, श्री. पाटील यांनी सांगितले की वडखळ ते थळ ही जी रेल्वेलाईन आहे, तर प्रकल्पग्रस्तला पीएपी म्हणून सर्टिफिकेट दिलेले नाही किंवा नोकरी दिलेली नाही.

तरी या पत्राव्दारे प्रकल्प सुरु होण्याअगोदर प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याची मागणी आम्ही करत आहोत.

या प्रकल्पासाठी २७५ टन अमोनियाचा वापर होणार आहे. अमोनियाच्या वापरामुळे सभोवतालच्या परिसरातील लोकांना धोका आहे असे आपल्या अहवालात आहे. अमोनिया ५,००० पीपीएमपेक्षा जास्त वातावरणात आढळल्यास मृत्यू संभवतो. आपला जीव वाचविण्यासाठी प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. आरसीएफ प्रकल्पात अमोनियाचे उत्पादन प्रचंड प्रमाणात होत असते व २०,००० टन व ५,००० टन अमोनिया टाक्यांमध्ये साठवलेला असतो. तर परिसरातील जनतेस त्याबाबत कोणतेही प्रशिक्षण देण्यात आलेले नाही.

शासनाच्या निर्देशांप्रमाणे वेळोवेळी आपत्कालिन व्यवस्थापन योजनेतंर्गत बैठका, प्रशिक्षण आरसीएफने देणे आवश्यक आहे. तसे होत नाही. उद्योग मंत्र्यांच्या जनता दरबारात त्याबाबत तक्रार केल्यानंतर मा. मंत्री महोदयांनी याबाबत आरसीएफला लेखी सूचना देऊनही कोणत्याही यंत्रणा उभारण्यात आलेली नाही.

सद्याच्या कायद्याप्रमाणे ८०% नोक-या या स्थानिकांनाच मिळाल्या पाहिजेत.

या प्रकल्पात रासायनिक वाहतुक ही टँकरने होणार आहे. तरी त्यातील ५०% टँकर्स हे स्थानिक असावेत.

तरी या सूचनांचा विचार करण्यात यावा ही नम्र विनंती. अध्यक्षा यांनी त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांवर प्रकल्प प्रवर्तकांना उत्तर देण्याची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी यांनी सांगितले की प्रथम प्रश्न रस्ते वाहतुकीबाबत होता. तर ३०० टन अमोनिया जो जादा तयार होतो, तो या नवीन प्रकल्पातच डीएपीसाठी वापरला जाणार आहे. तर आताची टँकरची वाहतुक पुर्णपणे बंद होईल. या व्यतिरिक्त फॉसफ्युरिक व सल्फ्युरिकची जी वाहतुक आहे, ती अंदाजे ५०-५५ टँकर्स आहे, तरी हया कच्च्या मालाचा प्रकल्प ही येथे आणण्याचा आमचा मानस आहे. प्रकल्पात उत्पन्न होणारे उत्पादन हे रेल्वेव्दारे जाणार आहे. तर रस्त्याबाबत ताशी एक टँकर एवढा लोड येणार आहे.

**३) श्री राजेन्द्र मधुकर ठाकूर, राहणार- अलिबाग, जिल्हा-रायगड:-**

माझे वडील २००४-२००९ पर्यंत उरण अलिबाग मतदार संघाचे स्थानिक आमदार होते. प्रकल्पग्रस्त PAPs - (Project Affected Persons) पीएपीचा प्रश्न मिटविण्याचा माझ्या वडिलांनी प्रामाणिक प्रयत्न केला. आम्ही १००% PAPs च्या सोबत आहोत. रोजगार, स्थानिकांना न्याय मिळावा ही आमचीपण भावना आहे. पण त्याचप्रमाणे इतरही अनेक समस्या आहेत. आमचा नवगाव कोळीवाडा बांधवांचा अनेक वर्षांचा प्रश्न आहे, जी गलबत असतील, ट्रॉली असतील, अनेकांना नुकसान पोहचते, तो प्रश्न महत्वाचा आहे. आता आरसीएफच्या रेल्वेविषयी मुद्दा उपस्थित

झाला. ही रेल्वे येताना १-२ कि.मी. लाईन्स लागतात. एखाद्या गंभीर रोग्यास अलिबागला नेता येत नाही. त्यासाठी ओव्हर ब्रीज किंवा इतर सुविधा त्वरित करणे महत्त्वाचे आहे.

मी आरसीएफ प्रशासनाचे आभार मानतो की त्यांनी वेळोवेळी निधी उपलब्ध करुन दिला. कॉलेजच्या इमारतीसाठी मदत केलेली आहे. विकास झाला पाहिजे, विकास करा. पण आमच्या स्थानिक लोकांवर अन्याय करणार असतील तर आम्ही ऐकणार नाही. विकास व्हावा, तो सर्व समावेशक व्हावा. स्थानिक तरुण व इतर काही शैक्षणिक अर्हता असलेल्या तरुण तरुणींना रोजगार आपण दिलाच पाहिजे. आमची मुले शिकलेली आहेत, तर त्यांना नोक-या मिळाल्या पाहिजे, त्यांना प्रथम प्राधान्य द्यायलाच पाहिजे. येथील लोकांचे जीवन समृध्द व्हायलाच पाहिजे.

४) **श्री. रविंद्र जयराम बेर्डे, ग्रुप ग्रामपंचायत बोरीस-गुंजीस सदस्यः-** चर्चेत आपण सांगितले की आपण सिव्हील हॉस्पीटलला उपकरणे दिली. तर ती कोणती दिली व कोणास दिली ? कारण तिथले सीटी स्कॅन मशीन चालत नाही. तर तेथे न्युरॉलॉजिस्ट नाहीत.

काही दिवसांपूर्वी आरसीएफमध्ये अपघात झाला, तर त्यांच्या हॉस्पीटलमधीलच ए.सी. बंद आहे. ही केंद्र सरकारची कंपनी असून ती जर एखादा मोठा अपघात झाला, तर कुठली उपकरणे उपलब्ध आहेत ? या पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समितीस माझी विचारणा आहे की आपण दाखवून द्यावे की येथे १००% प्रदूषण नाही. आमची रोपे काळी पडतात, तर हे लोक फक्त ५०० रुपयांची गोण देतात. आपण फवारणी करता असे सांगितले, तर गुंजीस बोरीस येथे अशी फवारणी कधी केली आहे काय ? आपण आवासला कृषि प्रदर्शन भरवले होते. तेथे घेवड्याचा शेंगा दाखविल्या, मात्र त्याबाबत प्रशिक्षण कधीही दिलेले नाही.

त्यांनी सांगितले की आर.सी.एफ.चे हॉस्पीटल अद्यावत नाही, तर सामान्य माणसे सोडा, आपला कर्मचारीसुध्दा राहत नाही. जे कंत्राटी पध्दतीवर कार्यरत आहेत,

त्यांनाही त्या हॉस्पिटलमध्ये प्रवेश नाही. २५% हे नियमित कर्मचारी असतील, तर ७५% हे कंत्राटी कर्मचारी आहेत. तर प्रथम हॉस्पीटल अद्यावत करा. येथे अध्यक्षा, यांनी याबाबत त्वरित स्पष्टीकरण देण्याची सूचना प्रकल्प अधिकारी यांना केली.

श्री. रविंद्र बेर्डे यांनी आरोप केला की प्रकल्पातील अधिका-यांना मुंबईला मोठ्या हॉस्पिटलला नेले जाते. नुकताच आरसीएफमध्ये एक अपघात झाला. त्याला कारण प्रशासनच आहे. कंत्राटी कर्मचा-यांचा या पूर्वी अपघात झाले, त्यांनाही आरसीएफ प्रशासनाने पैसे दिलेले नाहीत. प्रकल्पात किमान वेतन कायदा राबविला जात नाही. फक्त रुपये ३५०/- रुपयात कामगार येथे काम करतात.

उत्तर देताना प्रकल्पाच्या वैद्यकीय अधिकारी यांनी सांगितले की प्रकल्पात ३२ खाटा असलेले एनएबीएच मंजूर (NABH Accredited) हॉस्पीटल आहे. हॉस्पीटल अद्ययावत असल्यामुळे, Pre-Accreditation मिळालेले आहे. त्यावेळी श्री. बेर्डे यांनी रुग्ण मुंबईला का हलवतात याबाबत विचारणा केली. वैदकीय अधिकारी यांनी उत्तर दिले की त्यांना हॉस्पीटलमध्ये उपलब्ध असलेल्या सुविधांपेक्षा जास्त उपचारांची गरज असेल तर त्यांना त्या हॉस्पीटलला हलविण्यात येते.

श्री. बेर्डे यांनी सांगितले की प्रकल्पात कामगार भाजण्याचे प्रमाण जास्त आहे. तर त्यावेळी रुग्ण हे मुंबईला का पाठवतात ? वैद्यकीय अधिकारी यांनी सांगितले की रुग्णाचा त्यावेळचे भाजण्याचे प्रमाण व स्थिती पाहून निर्णय घेण्यात येतो.

अध्यक्षा यांनी विचारणा केली आपल्या प्रकल्पात अपघात- व्यक्ती भाजण्याचे प्रमाण जास्त असू शकते, तर त्यास मुंबईस हलविण्याची गरज पडू नये, येथेच भाजलेल्या व्यक्तीचा पुर्णपणे उपचार होण्याच्या दृष्टिकोनातून अद्यावत सोयी सुविधा उपलब्ध होण्यासाठी वरिष्ठ कार्यालयास प्रस्ताव सादर करावा.

श्री. बेर्डे यांनी आक्षेप नोंदविला की प्रकल्प जरी त्यांच्याच जागेत उभारत आहेत, तरी शेजारील गावांपासून थळ, बोरीस इ. पासुन प्रकल्पाचे सुरक्षित अंतर किती असले पाहिजे याचे उत्तर देण्यात यावे. थळ, बोरीस-गुंजीस, नवगाव येथे अती उग्र वास येतो.

अध्यक्षा यांनी स्थानिक नागरिकांची मागणी आहे की प्रकल्प विस्तारिकरणात येथील हॉस्पीटल हे पुर्णपणे अद्यावत करण्यात येऊन तेथे पूर्णपणे बर्न ट्रिटमेंट होणे गरजेचे आहे याची नोंद इतिवृतात घेऊन त्याबाबत पुढील कार्यवाही करण्याची सूचना केली.

अध्यक्षा यांनी पुढे विचारणा केली की जर अमोनिया गळती झाल्यास त्याबाबत पुढील उपाययोजना, स्थानिकांना त्याबाबत प्रशिक्षण या बाबतीतील माहिती देण्याची सूचना केली.

श्री. बेर्डे यांनी आरोप केला की अमोनियामुळे येथे हृदय रोगाचे प्रमाण वाढलेले आहे. येथे हिरवीगार शेती दिसत नाही. संपूर्ण शेतीचे नुकसान झालेले आहे. त्यांनी पुढे अमोनिया उत्पादन करताना अपघात टाळण्यासाठी तेथे बंकर्स केले पाहिजेत. टँकर पलटी झाल्यास सर्व प्रक्रिया करण्यास वेळ लागतो व प्रकल्पाची अग्निशमन गाडी येण्यास उशीर होतो. यांचे फायर स्टेशन हे बाहेर पाहिजे.

अध्यक्षा यांनी विचारणा केली उपस्थितांनी आक्षेप नोंदविलेला आहे की प्रकल्पाच्या फायर स्टेशनच्या गाड्या ह्या वेळेवर पोहचू शकत नाहीत याबाबत खुलासा करण्यात यावा.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की आसपासच्या शैक्षणिक संस्था, ग्रामस्थ, विद्यार्थी यांना आम्ही प्रशिक्षण दिलेले आहे. तसेच कॉल आल्यास आम्ही त्वरित सेवा पुरविलेली आहे उदा. मांडवा धोकवडे येथील नुकताच झालेला प्रसंग.

श्री. बेर्डे यांनी आक्षेप नोंदविला की फायर गाडीलाही गेटपास घेण्यास वेळ घ्यावा लागतो. त्यावेळी अध्यक्षा यांनी फायर गाडीला गेटपासची गरज नसावी असे मत मांडले. प्रकल्प प्रवर्तकाने खुलासा केला की, अग्निशमन गाडीस पासची गरज नसते. श्री. बेर्डे यांनी विविध वैद्यकीय योजना सीएसआर निधीतून आरसीएफ हॉस्पीटलमध्ये राबविण्याची विनंती केली.

अध्यक्षा यांनी हॉस्पीटल अद्यावत करणे बाबत वरिष्ठ अधिका-यांना उत्तर देण्याची सूचना केली. त्यांनी विस्तारिकरणाबरोबरच आरोग्याच्या सुविधांबाबत माहिती देण्याची सूचना केली.

प्रकल्पाच्या वरिष्ठ अधिकारी चीफ जनरल मॅनेजर यांनी सांगितले की आम्ही ३२ बेडेड हॉस्पिटलला ज्या ज्या सुविधा देता येतील, त्या दिलेल्या आहेत. कोविडनंतर अद्यावत यंत्रणा विकत घेण्यात आलेल्या आहेत. बैठकीत उपस्थित केलेल्या बर्न पेशंटबाबत सुविधांबाबत उत्तर देताना सांगितले की बर्न पेशंटबाबत त्याचे प्रमाण पाहूनच निर्णय घेण्यात येतो. अध्यक्षा यांनी विस्तारिकरणाबरोबरच हॉस्पीटल अद्यावत करणार का याबाबत विचारणा केली. याची नोंद इतिवृत्तात घेणार असल्याचे सांगितले. श्री. बेर्डे यांनी आक्षेप नोंदविला की कंत्राटी कामगारांनाही हॉस्पिटलमध्ये ट्रीटमेंट देत नाहीत.

श्री. राजेंद्र ठाकूर यांनी येथे मत मांडले की अग्निशमन गाड्या ह्या वेळेवर पोचाव्यात.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की बैठकीत केलेल्या सूचनांचा विचार आर.सी.एफ. अत्यंत गांभीर्याने करेल.

अध्यक्षा यांनी सूचना केली की हॉस्पीटल अद्यावत करणेबाबतचा प्रस्ताव मे. आर.सी.एफ. कंपनीने वरिष्ठ कार्यालयास कळवावा व नागरिकांना आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी सकारात्मक धोरण ठरवावे.

पुर्वी नेमणुक केलेल्या १० वी पास लोकं प्रकल्प चालवतात, तर आताच्या इंजिनीयर मुलांना प्रकल्पात का घेतले जात नाही ?

अध्यक्षा यांनी सूचना केली की ज्या संवर्गात कर्मचा-यांची गरज असेल, त्याबाबतची सर्व माहिती पदांसहित परिसरातील ग्रामपंचायतीस देण्यात यावी,

स्थानिकांसाठी प्रशिक्षण देण्याची सुविधा द्यावी व त्यातून स्थानिक तरुण तरूणींना रोजगाराची संधी देण्यात यावी. स्थानिक तरुण तरूणींना प्रशिक्षण काही कालावधीसाठी देण्यात यावे. आपणास जर शक्य नसेल तर राज्य शासनाचा कौशल्य विकास विभाग आहे. त्यांच्याशी समन्वय करुन तसे विशिष्ट प्रशिक्षण स्थानिक तरुण तरूणींना देऊन प्रकल्पात समाविष्ट करण्यात यावे.

५) **सौ. मानसी महेंन्द्र दळवी, माजी सदस्या, जिल्हापरिषद, रायगड:-**

कंपनी व्यवस्थापन खोटी उत्तर देत आहे. थळ गावाची सरपंच म्हणून १५ वर्षे काम केलेले आहे. ते फक्त आश्वासन देतात, पण प्रत्यक्षात काहीही करत नाहीत. जर प्रकल्प आमच्या जमिनीवर उभारला जातो तर येथील नागरिकांना वैद्यकीय सुविधा का दिल्या जात नाहीत. त्यांच्या शाळा, कॉलेजात आमच्या मुलांना का प्रवेश दिला जात नाही. मग स्थानिक मुलांकडून जास्त फी आकारली जाते. त्यांच्या मैदानावर फक्त त्यांचे कर्मचारी, अधिकारी असतात. आर.सी.एफ. ते सायमन कॉलनी हा रस्ता त्यांनी दुरुस्त न करता थळ ग्रामपंचायतीस वर्ग केला.

त्यांनी सांगितले की ज्या दिवशी अमोनिया सोडतात, त्या वासामुळे गावातील लोकांच्या डोळ्यातून पाणी येत असते. झाडांची पाने काळी होऊन करपून खाली पडतात. त्यासाठी काय नियोजन आहे.

जर आरसीएफ एखाद्या मंत्र्याचे गाव दत्तक घेते, तर आमच्या गावाचा विकास का करत नाही. स्थानिकांच्या घरांवर नांगर फिरवून कंपन्या स्थापन करण्यात आल्या. येथे भरती झाली, तेव्हा रायगड जिल्ह्यातील फक्त एकच मुलगा नियुक्त झाला. प्रकल्पग्रस्त म्हणून आम्ही उपोषण, लढा देतो, पण आमच्या मुलांना नोक-या मिळत नाहीत.

त्यांनी सांगितले की बैठकीत मुद्दा उपस्थित झाला की परिसरात कॅन्सर सारखे आजार वाढत आहेत. तर त्यासाठी आरसीएफने सढळ हाताने मदत करणे गरजेचे

आहे. तसेच कोरोनामुळे बरेच लोक संकटात आले. ब-याच ठिकाणी आईवडिल गेले, पण लहान मुले वाचली आहेत. अशा मुलांना मदत करणे आपले कर्तव्य आहे. तरी अशा ठिकाणी मदत करण्यात यावी.

**६) श्री प्रवीण ठाकूर, जिल्हा-रायगडः-**

ही जनसुनावणी पार पाडता आली, याचा फायदा आपल्याला आपल्या अडीअडचणी सांगता आल्या. आरसीएफमुळे अलिबागचा विकास झाला हे आम्ही मान्य करतो. पण ब-याच अडीअडचणी येथील लोकांना सहन कराव्या लागतात. नवगाव, थळच्या लोकांना सहन कराव्या लागतात. नवीन प्रकल्प येतो, म्हणून जुन्या अडचणींकडे दुर्लक्ष करणार, तर हे चालणार नाही. आमच्या मागण्या मुलांसदर्भात, नोक-या संदर्भात, प्रकल्पग्रस्तांबाबत असून त्यातील दोन मागण्या म्हणजे आमची स्थानिक मुलेच कामास घेतली पाहिजेत. ती कमीतकमी ८०% मुले नोकरीवर घ्या. तसेच दुसरा मुद्दा अद्यावत हॉस्पीटल. जर इतर संस्था हॉस्पिटल बांधतात, तर आरसीएफ का हॉस्पिटल बांधू शकत नाही. त्यासाठी जी फी असेल, ती घेण्यात यावी. दुर्दैवाने आमच्या येथे शाळा, हॉस्पिटल बांधली नाहीत. त्याचबरोबर येथे शैक्षणिक सुविधांकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

त्यांनी पुढे मुद्दा मांडला की बैठकीत आरसीएफ रेल्वेचा उल्लेख करण्यात आला. तेथे ओव्हर ब्रीज झालाच पाहिजे. येथून काही कि.मी. असलेल्या वडखळला, पेणला जाण्यासाठी काही तास लागतात. जाताना अपघात होतात, शिवाय पेट्रोलचे दर वाढले आहे. तर दऱ्याखोऱ्यातून रेल्वे बांधत असून आम्हांला रेल्वेची आवश्यकता आहे. पण पॅसेंजर रेल्वेकरिता आपणाकडून ना हरकत प्रमाणपत्र हवे म्हणजे हवेच. त्यास आडकाठी आणल्यास रेल्वे रुळावर झोपण्यास कमी पडणार नाही.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पॅसेंजर रेल्वे चालू करण्यास ना हरकत प्रमाणपत्र अदा करण्यास काही अडचण आहे काय याबाबत

प्रकल्प प्रवर्तकांनी विचारणा केली. त्यावेळी प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की उपस्थित करण्यात आलेल्या सूचनांचा आरसीएफ गांभीर्याने विचार करेल.

**७) डॉ. महेंन्द्र वाटकरे, राहणार - नवगाव, तालुका-अलिबाग, जिल्हा- रायगडः-**

आरसीएफने एक अभिवचन दिलेले होते व त्याचे इतिवृत्त जिल्हाधिकारी कार्यालयात आहे. ते अभिवचन म्हणजे नवगावला जेट्टी बांधून द्यायची. त्याबद्दल सद्यस्थिती.

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की जेट्टी थळ नवगावच्या कोळी बांधवांसाठी त्यांच्या मागणीनुसार २०१३-१४ च्या दरम्यान प्रस्ताव तयार करण्यात आलेला होता. त्याबाबत केंद्र सरकार व राज्य सरकारचा हिश्श्याबाबतही धोरण तयार झालेले होते. समुद्रात जेट्टी बांधण्याचा जो काही विषय आहे, तो आरसीएफ पूर्ण करु शकत नाही. त्यावेळी असे ठरले की केंद्र शासनाच्या प्रस्तावात राज्य सरकारने सुध्दा आर्थिक भार उचलायचा, जर राज्य शासनाकडे पैसे नसतील, तर आरसीएफ हिस्सेदार होईल. त्याबाबतीत सर्वेक्षण करण्यात आले, पश्चिम बंगाल फिशरिज बोर्डाचे तज्ज्ञ समिती आलेली होती. प्रस्ताव तयार करुन भारत सरकारच्या बंदर विभागाने पुढील कार्यवाही सुरु केलेली होती. केंद्र सरकारचे ७५% व राज्य सरकारने २५% देण्याचे धोरण ठरले, महाराष्ट्र शासनाने राज्य शासनातर्फे २५% हे आर.सी.एफ.ला भरण्याचे निर्देश दिल्यानंतर बोर्ड मिटींगमध्ये त्याबाबत तरतुद करण्यात आली. गेल्या वर्षी हा विषय परत शासकीय दरबारात चर्चेसाठी आलेला होता. त्यासाठी आर्थिक सहकार्य करण्याचे आरसीएफने आश्वासन दिलेले आहे. मात्र जेट्टी बांधणे आर.सी.एफ. करु शकत नाही.

अध्यक्षा, यांनी सदरहू प्रस्तावाचा पाठपुरावा करण्याची सूचना केली. जेएनपीटीवरुन माल आणण्याऐवजी तुमच्या जेट्टीवर येथे माल आणणे आपल्या फायद्याचे आहे. त्यावेळी प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की ही जेटी थळ नवगाव येथील कोळी बांधवांसाठी होती व त्यांना तेथे खळ तयार करुन देण्यात येणार होते.

हा भारत सरकारचा उपक्रम होता. अध्यक्षा यांनी सूचना केली की जर आरसीएफ ला त्या जेट्टीचा काही अंशी फायदा होणार असेल तर त्यांनी त्याचा पाठपुरावा करावा.

डॉ. महेंन्द्र वाटकरे यांनी एनपीके / डीएपी चा फॉर्मुला विचारला. त्यांनी जो सल्फर तयार होईल, त्याचे काय करणार याबाबत विचारणा केली.

डॉ. महेंन्द्र वाटकरे यांनी सीएसआर, नफ्याच्या किती टक्के असतो याबाबत विचारणा केली. त्यावेळी उत्तर देण्यात आले की सीएसआर हा मागील तीन वर्षांच्या नफयाची सरासरी काढून त्याच्या दोन टक्के असतो. २०२०-२१ चा CSR निधी हा ३.५८ कोटी, २१-२२ चे ६.८६ कोटी आहे. २०२२-२३ चा उपलब्ध CSR निधी ११.७० कोटी होता. त्यापैकी रु. ६.७६ कोटी विविध उपक्रमान्वये कंपनीच्या आजू बाजूच्या परिसरात वापरण्यात आला आहे.

डॉ. महेंन्द्र वाटकरे यांनी ईएससी (Environmental Social Commitment) बाबत विचारणा केली. प्रकल्प प्रवर्तकांनी संपूर्ण माहिती दिल्यानंतर डॉ. वाटकरे यांनी तो प्रकल्प परिसरातच वापरण्याची सूचना केली. प्रकल्प प्रवर्तक यांनी ते मान्य केले.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी ईएससी बाबत माहिती दिली की प्रकल्प नवीन येत असताना प्रकल्प प्रवर्तकांना प्रकल्पाच्या खर्चाच्या २.५% एवढी रक्कम पुढील पाच वर्षांसाठी परिसरात विविध पर्यावरण योजनांसाठी, पिण्याचे पाणी योजनांसाठी, शौचालये बांधण्यासाठी व इतर पर्यावरणपुरक बाबींसाठी खर्च करावा लागतो. माननीय जिल्हाधिकारी यांची मान्यता घेऊनच तो खर्च करावा लागतो.

प्रकल्प प्रवर्तकाने खुलासा केला की, प्रकल्पाचा एकुण अंदाजित खर्च हा रु.९१४.५८ कोटी आहे. हया मध्ये GST कर आणि प्रकल्प प्रस्थापित झाल्यानंतर लागणाऱ्या कच्चा मालाचे एका महिन्याचे खेळते भांडवल जोडलेले आहे. हे वजा करता प्रस्तावित प्रकल्पाची मुळ किंमत ही अंदाजे रु. ७०२.२४ कोटी असेल. याचे

२.५% म्हणजे रु. १७.५६ कोटी इतके ईएससी च्या अंतर्गत पुढील पाच वर्षात खर्च केले जातील.

यावेळी उपस्थितांनी एकत्रित पिण्याच्या पाण्याचे पैसे देणे, रस्ते खराब याबाबत आक्षेप नोंदविण्यात आले. त्यांनी अध्यक्षा यांना प्रकल्पाच्या २.५ कि.मी परिघात भेट देऊन पाहणी करण्याची विनंती केली.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले बोरीस-गुंजीस व नवगाव या ग्रामपंचायती बाबतीतील महसूलाबाबत जो आदेश शासनाकडून देण्यात येईल तो पाळण्यात येईल.

यावेळी सौ. मानसी दळवी यांनी आरोप केला की गेल्या वर्षी पूर आला असताना आर.सी.एफ.मधून जाणा-या नवगाव नाल्यावरील दरवाजे उघडले नाही म्हणून सर्व पाडा हा पुराच्या पाण्यात बुडून जात होता. जेव्हा गट विकास अधिकारी यांनी मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करु अशी धमकी दिल्यानंतरच आरसीएफ प्रशासनाने दरवाजे उघडले.

अध्यक्ष यांनी प्रकल्प प्रवर्तकांना सीएसआर निधीबाबत त्वरित कार्यवाही व प्रत्येक ग्रामपंचायतीस त्या त्या कामानुसार निधी खर्च करण्याची सूचना केली. त्यावेळी उपस्थितांनी एकत्रितपणे नवगावची जेट्टी प्रकल्पातील पाईप वर आल्यामुळे, आर.सी.एफ. हे करण्यास तयार झाले आहे असा आरोप केला. प्रकल्प प्रवर्तक यांनी ग्रामपंचायतीतर्फे प्रस्ताव आल्यानंतर त्याप्रमाणे सीएसआर निधी खर्च करण्यात येईल असे सांगितले. त्यावेळी थळ-नवगाव पूल खराब झाला असून तो दुपदरी करण्याची मागणी केली. त्यावेळी अध्यक्षा यांनी संबंधित सर्व व्यक्तींना एक महिन्यात काम सुरु न झाल्यास जिल्हाधिकारी यांना भेटण्याची सूचना केली.

**८) श्री. शिरीष राजके, माजी आरसीएफ कर्मचारीः-**

उपस्थित प्रकल्प अधिका-यांना योजना मंजूर करण्याचा अधिकार आहे का, कारण येथील उपस्थित अधिका-यांना काहीही अधिकार नाही. ते त्यासाठी सक्षम अधिकारी नाहीत. भरती प्रक्रियेत पारदर्शकता नाही.

त्यावेळी प्रकल्प अधिकारी यांनी माहिती दिली की आरसीएफ ही भारत सरकारचा उपक्रम आहे, त्यामुळे त्यांना भारत सरकारचे सर्व प्रशासकीय व आर्थिक नियम पाळावे लागतात, ते बंधनकारक आहेत. भरतीप्रक्रियेत पारदर्शकता येण्यासाठी त्रयस्थ कंपनी लेखी परीक्षा घेण्यास नेमण्यात आलेली आहे. येथे अधिकारी वर्गासाठी सर्व भारतभर तर कामगारांसाठी स्थानिक रोजगार विनिमय कार्यालय (Local employment exchange) यांच्याशी संपर्क साधण्यात येतो. ही पारदर्शक प्रक्रिया आहे.

**९) श्री सुनील पत्रे, थळ, सरपंच, गट ग्रामपंचायत, थळ, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगडः-**

१९८०-८२ साली प्रकल्पात कामगारांची संख्या किती होती ? लेखी स्वरुपात गट ग्रामपंचायतीस माहिती देण्यात यावी. सात-आठ वर्षात जे कर्मचारी निवृत्त झाले, त्यांची जमिन प्रकल्पात गेली. त्याची माहिती गट ग्रामपंचायतीस थळ, जिल्हाधिकारी कार्यालयास माहिती कळविण्यात यावी.

तर असे लक्षात येईल की १४१ लोकांबाबत Contempt of Court झालेले आहे.

त्यावेळी अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की जिल्हाधिकारी, रायगड यांचा अहवाल व पत्रे जाणार आहे.

**१०) श्री. किशन कटोर , राहणार नवगाव, तालुक-अलिबाग, जिल्हा- रायगड**

जर स्थानिक मुलांना कायद्याच्या नावाखाली प्रकल्पात नोकरी मिळत नसेल, तर मग हा प्रकल्प आम्हाला नको. त्यांनी प्रकल्प अधिकारी पूर आल्यानंतर दार उघडत नाही असा आक्षेप नोंदविला.

प्रकल्पाचे अधिकारी यांनी विचारणा केली की नवगावच्या ड्रेनविषयी जेथे भरतीचे पाणी उलटे येते याबाबत बोलत आहेत काय, त्यांनी उत्तर दिले की उधाणाचे पाणी उंच असते ५ मीटरपर्यंत, तेथे एक फाळकं लावलेले आहे, त्यामुळे गावातील

पाणी बाहेर जाईल, पण बाहेरचे पाणी आत येणार नाही. यावेळी अध्यक्षा यांनी जर स्थानिक तक्रार करत आहेत, तर काहीतरी त्रुटी आहे हे सिध्द होते.

श्री. कटोर हे बरेच आक्रमक झालेले होते. त्यावेळी कंपनी प्रशासनाने सांगितले की ग्रामपंचायतीस आम्ही बरोबर घेऊन सर्वेक्षण करण्यात येईल व सद्यस्थितीबाबत ग्रामस्थांना अवगत केले जाईल.

अध्यक्षा यांनी सांगितले की आठ दिवसात ग्रामपंचायतीस बरोबर घेऊन सर्वेक्षण करावे व त्यांचे समाधान करावे.

**११) श्री. चित्रसेन कावळे, राहणार-नवगाव, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगडः-**

पाईपमुळे जेटी बनणार आहे. आरसीएफ मधील प्रकल्पाला परवानगी मिळते, तर प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून त्यास परवानगी का मिळत नाही.

अध्यक्ष, यांनी उत्तर दिले की प्रथम प्रकल्प प्रवर्तक प्रस्ताव पाठवतील, प्रशासन पाठपुरावा करेल.

प्रकल्प प्रवर्तक यांनी माहिती दिली की प्रस्ताव हा महाराष्ट्र शासनाकडून तयार करण्यात आला होता. त्या प्रकल्पासाठी प्राथमिक बाबींची पूर्तता म्हणजे सर्वेक्षण, खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले होते. पश्चिम बंगालच्या तज्ज्ञ समितीने पुढील सर्वेक्षण केलेले होते. त्या जेट्टीच्या खर्चाची तरतुद आरसीएफने केलेली होती.

श्री. चित्रसेन कावळे यांनी आक्षेप नोंदविला की पाईपलाईनमुळेच जेट्टी बांधणार आहेत. स्थानिकांचे गेले कित्येक वर्षे कोटींचे नुकसान झाले, मात्र एकही पैसा आर.सी.एफ.ने दिला नाही. तरी प्रत्येक बोटीमागे इतक्या वर्षांची नुकसानभरपाई देण्यात यावी.

**१२) श्री. हेमंत सुरेकर, राहणार-नवगाव, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगडः-**

पाईपाला बोटी आदळून दहा बोटी पूर्णपणे नष्ट झालेल्या आहेत. बोटीखालचा पाया हा दरवर्षी खराब होतो. आतापर्यंत एकही पैशाची नुकसानभरपाई आरसीएफकडून मिळालेली नाही.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की प्रस्ताव असा होता की ज्यावेळी पाईपलाईन टाकली, तेव्हा ती दीडमीटर खाली होती. तेव्हा छोट्या बोटी होत्या. भरती-ओहोटीच्या पाण्यामुळे तो पाईप ओपन झालेला आहे.

त्यावेळी अध्यक्षा, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी सूचना केली की येथे स्थानिक कोळी समाजाचे तक्रारीच्या अनुषंगाने प्रकल्प प्रवर्तक यांनी सुधारित प्रस्ताव त्वरित सादर करण्यात यावा. चर्चेतील मुद्दे व नुकसान भरपाईबाबतचाही उल्लेख सुधारित प्रस्तावात करण्यात यावा. जनसुनावणीत नागरिकांनी मांडलेल्या आक्रोशामुळे सुधारित प्रस्ताव सादर करण्यात येत आहे, असा उल्लेख करण्यात यावा.

यावेळेस काही उपस्थितांनी माहिती सांगितले की फिशरीज विभागानेही याचा पंचनामा केलेला असून मोबदला देण्यास सांगितले आहे. अध्यक्षा यांनी प्रकल्प प्रवर्तक यांना त्यांच्या Technical Wing चे मत घेण्याची सूचना केली.

**श्री. राजेन्द्र मधुकर ठाकूर यांनी** सांगितले की आता प्रकल्प प्रवर्तकांना स्थानिकांच्या बोटींची नुकसानभरपाई ही द्यावीच लागेल. मात्र याबाबत एक समाधानकारक पर्याय हा काढावाच लागेल.

यावेळेस अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की नैसर्गिक आपत्ती शिर्षकांखाली बोटींचे नुकसान प्रत्येक वर्षी किती झाले त्याबाबतचा प्रस्ताव हा जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करण्यात यावा. नैसर्गिक आपत्ती विभागाचे जिल्हाधिकारी हे अध्यक्ष आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयातून आपणास नुकसान भरपाई मिळणेबाबत पुढील कार्यवाही करण्यात

येईल. सदरहू प्रस्ताव उपस्थितांपैकी एक व्यक्तीने वैयक्तिक आणून देण्याची सूचना केली.

अध्यक्षा यांनी सर्व उपस्थितांना सूचना केली की भविष्यात पूर आल्याने दरवाज न उघडणे असे कंपनीने केल्यास स्थानिकांनी जिल्हाधिकारी यांना त्वरित तक्रार करण्याची सूचना केली, जिल्हाधिकारी आपत्ती व्यवस्थापनेतंर्गत संबंधित कंपनीकडून ते काम करुन घेतील.

**१३) श्री. दिलेश चिटके, अध्यक्ष थळ मच्छिमार सोसायटी.**

लेखी आक्षेप नोंदविला आहे. प्रकल्पातील खतमिश्रित सांडपाणी समुद्रात सोडले जाते, त्यामुळे कालव, झिंगा, शिंपले ही मासे मिळतच नाहीत. ते मारले जातात. १००-१५० लोकांची रोजीरोटी नष्ट झालेली आहे. तसेच नवीन प्रकल्पामुळे सांडपाणी वाढेल व आमचे नुकसान जास्तच होईल.

**१४) श्री हेमंत सुरेकर, राहणार-नवगाव, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगडः-**

रेल्वे फाटकाजवळ गंभीर रुग्ण आल्यास त्याला न्यायला जागा नाही. ओव्हर ब्रिजला वेळ लागेल, तर तात्पुरता पालथी रोडवरुन रस्ता गेलेला आहे. तेथून रुग्णवाहिका जाण्याएवढा रस्ता होऊ शकतो काय ?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की तो पूल आता रुंद करण्यात येत आहे, जेणेकरुन रुग्णवाहिका जाऊ शकेल.

त्यावेळी **श्री. रविंद्र जयराम बेर्डे, ग्रुप ग्रामपंचायत बोरीस गुंजीस सदस्य यांनी** आक्षेप नोंदविला की त्या ब्रीजवरुन आपली गस्त चालू असते, तर अजुनपर्यंत का केला नाही ?

अध्यक्षा यांनी सांगितले की, एका महिन्यात काम सुरु करण्याचे आश्वासन कंपनी प्रशासनाने दिलेले आहे. त्यावेळी श्री. बेर्डे यांनी सांगितले सायकलस्वार सुध्दा खाली पडेल असा ब्रीज आहे. त्या ब्रीजमुळे यांच्याही प्रकल्पास धोका आहे.

त्यावेळी अध्यक्षा यांनी जनसुनावणी मध्ये दिलेली आश्वासने पाळणे बंधनकारक असल्याचे सांगितले.

**श्री. रविंद्र जयराम बेर्डे , ग्रुप ग्रामपंचायत बोरीस -गुंजीस सदस्य यांनी** मागणी केली की जनसुनावणीत प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेली आश्वासने पूर्ण केली की नाही यासाठी पुढील कोणती योजना राबविण्यात येईल ?

अध्यक्षा यांनी सांगीतले की यासाठी ३० दिवसांनी परत एक आढावा बैठक आयोजित करण्यात येईल व त्याची नोंद इतिवृत्तांत घेण्यात येईल.

उपस्थितांनी इतिवृताची प्रत केव्हा मिळेल याबाबत विचारणा केली असता इतिवृत्त पुर्ण होताच जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड - अलिबाग, म. प्र. नि. मंडळ रायगड येथे मिळतील अशी माहिती अध्यक्षा यांनी दिली.

येथे सौ. मानसी दळवी, जिल्हा परिषद सदस्य यांनी मागणी केली की प्रत्येक ग्रामपंचायतीस या बैठकीच्या इतिवृताची प्रत देण्यात यावी.

**१५) श्री. दिलेश महादेव चिटके, अध्यक्ष, मच्छिमार संघटना थळ :-**

हा प्रकल्प शेतक-यांच्या, स्थानिक लोकांच्या फायद्याचा, पण या प्रकल्पाचे पूर्ण पाणी हे खालच्या खाडीत जाते. तर मच्छिमारांचे काय करणार? स्थानिक मच्छिमार आहेत, त्यांचे काय करणार?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की आपल्या प्रत्येक प्रकल्पात सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी ईटीपी सयंत्रणा उभारण्यात आलेली आहे. तसेच कुठलेही पाणी खाडीत जाणार नाही म्हणून सर्व तळी वर्षभर कोरडी ठेवण्यात येतात. त्याचप्रमाणे २४ तास गस्त घालण्यात येते की पाणी प्रकल्पाबाहेर जाऊ नये.

श्री. चिटके यांनी आरोप केला की तीन महिन्यांपूर्वी खाडीत पाणी जाऊन मासे मेलेले आहेत. मी पंचनाम्यासाठी बोलविले असता कोणीही आलेले नाही. त्यावेळी अध्यक्षा यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांना बोलविण्याची सूचना केली. ओहोटी भरतीच्या वेळी पाणी सोडले जाते. ते मासे जागेवर स्थिर राहत नाहीत.

त्यावेळी अध्यक्षा यांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिका-यांना बोलविण्याची सूचना केली. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी पंचनामा करतात व गुन्हा दाखल करतात असे सांगितले.

श्री. चिटके यांनी पुढे आक्षेप नोंदविला की डिसेंबर महिन्यात कंपनीच्या दिशेने वारा समुद्रात जातो. म्हणजे कंपनीतील दूषित हवा किना-यावर जाते. त्यामुळे मच्छी वाळविण्यावर दुष्परिणाम होतो.

श्री. चिटके यांनी सांगितले की प्रकल्प येऊ द्या, पण संपूर्ण थळ गाव हे दत्तक घेण्यात यावे.

**१६) श्री राकेश पाटील, उपसरपंच, मान तर्फे झिराड :-**

सीएसआर वाटपात पारदर्शकता नाही असे माझे मत आहे. १९८२ पासून थळ प्रकल्प आहे. पण गेल्या वर्षी आमदार यांच्या सांगण्यावरुनच ४०० मीटर अंतरावरील असणा-या मान तर्फे झिराडला मिळाला. सीएसआर वाटप २-३ वर्षात कसे झाले याची माहिती देण्यात यावी. त्याची यादी बाधित ग्रामपंचायतीस दिली तर बरे होईल.

अध्यक्षा यांनी संबंधितांना प्रत देण्याची सूचना केली.

दुसरा मुद्दा असा आहे की आरसीएफ सांगते की आम्ही पाणी पुरवठा करतो. तर ग्रामपंचायत एमआयडीसीकडून पाणी विकत घेतो. तर आरसीएफ आम्हाला पाणी का देत नाही, जर त्यांचा धुर आम्ही घेतो. आमची बागयती क्षेत्रे नष्ट होणार आहेत. तर पाणी आर.सी.एफ.ने दिले पाहिजे.

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की ग्रामपंचायत व आरसीएफमध्ये करार झालेला आहे. येथे एमआयडीसी पाईप लाईन्स मधून पाणी पुरवठा होतो. त्यांच्या अटी व शर्ती आहेत की कोणालाच पाणी द्यायचे नाही. पण परिसरातील काही ग्रामपंचायती उदा. थळ, नवगाव, याची जबाबदारी आरसीएफने घेतलेली असून करार करण्यात आलेले आहेत. १२०० घनमीटर पाणी थळला, ६०० घनमीटर पाणी नवगावला, इतर

ग्रामपंचायतीना अशी विनंती करण्यात आली, कारण एमआयडीसीचे म्हणणे आहे की सदरहू पाणी हे उद्योगांसाठी राखीव आहे. जिल्हा परिषद किंवा शासनाच्या वेगळ्या योजना आहेत. तरीही आमच्या पाण्यातील काही हिस्सा जो बचत होतो, ते देण्याचा प्रयत्न करतो. आम्ही असे म्हटले होते की गुंजीस ग्राम पंचायतीस पाण्याचा फोर्स मिळत नाही. तर जिल्हा परिषदची योजना आणावी म्हणजे सर्वांना पाणी मिळेल.

अध्यक्षा यांनी सांगितले की इतर पाणीपुरवठा योजना ग्रामपंचायतीने तयार कराव्यात. त्यास प्रकल्प प्रवर्तक सीएसआर अंतर्गत मदत करतील.

त्यावेळी एक उपस्थितांनी प्यायला पाणी मिळत नाही पण पाईप लाईन फुटलेली असते असा आक्षेप नोंदविला. अध्यक्षा यांनी सांगितले की सदरहू बाब जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अखत्यारित येते, आपण त्यांना एक निवेदन देऊन त्याची एक प्रत जिल्हाधिकारी कार्यालयात देण्यात यावी.

**श्री. रविंद्र जयराम बेर्डे, ग्रुप ग्रामपंचायत बोरीस गुंजीस सदस्य यांनी** मागणी केली की कणकेश्वरला पाणी येत नाही. त्याबाबत खुलासा द्यावा. प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की आमची स्वतःची कॉलनी आहे. आता तेथे विनापरवाना एवढी पाण्याची कनेक्शन झाली की आमच्या स्वतःची कॉलनीत पाणी येत नाही. त्यामुळे आर.सी.एफ. कॉलनीला पाणी टँकरव्दारे पाणीपुरवठा करण्यात येतो. आम्ही थळ, नवगावप्रमाणे बोरीसगुंजीला पाणीपुरवठा योजना तयार करण्याची सूचना केलेली होती. टाकी बांधल्यास त्यास सीएसआर अंतर्गत मदत करण्यात येईल.

**श्री. राजेन्द्र मधुकर ठाकूर यांनी** सांगितले की गावात गुरचरण जागा आहे तेथे टाकी बांधायची आहे. अध्यक्षा यांनी तेथे बांधता येते असे सांगितले.

अध्यक्षा यांनी मत मांडले की कंपनीचा समन्वय स्थानिकांबरोबर कमी वाटतो. त्यांनी उपस्थितांना एक निवेदन तयार करण्याची सूचना केली त्यात काही उपस्थित विषयांचा अंतर्भाव असावा. त्यांनी मत मांडले की कंपनीचा स्थानिकांबरोबर समन्वय असता तर एवढा आक्रोश झाला नसता. त्यांनी ग्रामस्थांच्या प्रश्नांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक लावण्याची सूचना केली.

**१७) श्री. मकरंद जनार्धन सुंकले, थळ, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगडः-**

गेले ३५ वर्षे प्रकल्पग्रस्त म्हणून नोकरीची मागणी करत आहेत. माझे प्रकल्पग्रस्तांच्या संदर्भात समाधान झालेले नाही. आर.सी.एफ. ने ३८५ दाखल्यांवरती ६१७ लोकांना नोक-या दिल्या. तर ज्या अतिरिक्त लोकांना दिल्या, ते खरे प्रकल्पग्रस्त होते का ?

अध्यक्षा यांनी सांगितले की काल हेच प्रश्न जिल्हाधिकारी यांनी त्यांना विचारले आहेत. उत्तर आल्यानंतर त्याची प्रत देण्यात येईल. हायकोर्टाने लिहिले आहे की जिल्हाधिकारी यांनी तपासावे. श्री. सुंकले यांनी सांगितले की मागच्या वर्षी दोन दुर्घटना झाल्या - २३ फेब्रुवारी व १९ ऑक्टोबर.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की राष्ट्रीय केमिकल्स आणि फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ) यांच्या विद्यमान आर.सी.एफ. सुविधा, थळ, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र येथे १२०० एमटीपीडी (डीएपी आधार) एनपीके / डीएपी कॉम्प्लेक्स फर्टिलायझरचा विस्तारीत प्रकल्प स्थापित करण्याच्या पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी म. प्र. नि. मंडळ व जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड यांच्यातर्फे आयोजित करण्यात आली होती. बैठकीत स्थानिकांनी अनेक सूचना, हरकती, आक्षेप नोंदविलेले असून त्याचा बैठकीच्या इतिवृत्तात समावेश करण्यात येईल. त्याचप्रमाणे बैठकीत अनेक व्यक्तींनी सूचना / आक्षेप सादर केल्या असून त्यास प्रकल्प प्रवर्तकांकडून उत्तर मिळाल्यानंतर ते उपलब्ध करुन देण्यात येतील. लेखी सूचना, हरकती या अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व बैठकीच्या इतिवृत्तासोबत अध्यक्षांच्या मंजूरीने म. प्र. नि. मंडळाच्या मुख्यालयातर्फे भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल विभागास सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल. सदस्य यांनी सर्व उपस्थितांचे, कंपनी प्रशासन व पोलिस प्रशासन यांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या वतीने जनसुनावणी ही संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्षांनी आभार मानून ही जनसुनावणी पुर्ण झाल्याचे सांगितले.

या जनसुनावणीच्या वेळी उपस्थित नागरिकांकडुन प्राप्त झालेले १४ सूचना / आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

**(रां. स. कामत)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,रायगड-२,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड

**(विद्यासागर किल्लेदार)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रभारी प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड

**(डॉ. पदमश्री बैनाडे)**
अध्यक्षा,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड,
जिल्हा-रायगड